REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# ख्रिश्चन धर्मातील युध्दे



डॉ. शिला स्वामी
माधवराव पाटील कला व शास्त्र महाविद्यालय मुरुम,
ता. उमरगा जि. उस्मानाबाद.

**सारांश :-**

ख्रिश्चन आणि मुस्लिम यांच्यात झालेल्या धर्म युध्दाचा पाठीमागे राजकीय, धार्मिक पार्श्वभूमी ही महत्वाची होती. दोघांचे ही ध्येय व उद्दिष्ट हे आपआपले वर्चस्व निर्माण करण्याचे होते. त्यामुळे संघर्षाला सुरुवात होणे हा त्यामागे भाग होता. पोपला आपली सत्ता सर्वश्रेष्ठ करायची होती. व ख्रिश्चनांची पवित्र भूमी ही मुस्लिमांच्या वर्चस्वातून मुक्त करायची होती यातून ख्रिश्चन मुस्लिम संघर्षाची बीजे त्यात रोवली गेली. त्यामुळे प्रत्येक सत्तेला आपआपला प्रदेश विस्तार करणे व अन्यायाची राजवट समाप्त करणे हाच उद्देश यामागे होता.

**प्रस्तावना :-**

येशू ख्रिस्ताच्या नावाने प्रचलीत असलेल्या संप्रदायाला ख्रिस्ती धर्म म्हणतात. ख्रिस्ती लोकांचा असा विश्वास आहे की येशू नेहमी जिवंत राहणारा व देवतारुप आहे व तो देवच आहे आणि मानवाच्या कल्याणाकरता तो जगात आलेला आहे. ख्रिस्त हा शब्द ग्रीक भाषेतील असून तो ख्रिस्तोस हया शब्दावरुन बनला आहे. त्याचा अर्थ अभिषिक्त असा होतो. यालाच हिब्री भाषेत 'मसीहा' असे म्हणतात. येशूला मसीहा म्हणजे परमेश्वराचा अवतार असे म्हटले जाते.

येशू ख्रिस्ताला त्याच्या आयुष्यात फार विरोध सोसावा लागला होता त्याचे मोठेपण त्याच्या मृत्यूनंतर जगाला पटले होते. ही एकटया येशूची शोकांतीका नसून ती जगातील अनेक प्रसिध्द असणा-या साधू संतांची, समाजसुधारकांची आणि राज्यकर्त्योंची आहे. त्यामुळे येशू या धर्म संस्थापकास आणि समाजसुधारकास आयुष्यभर त्रास सहन करावा लागला. जगातील प्रचलीत असणा-या पण विधायक अशी रुढीपरंपरा नष्ट करुन सर्व समाजाच्या हिताची समाजरचना निर्माण करणे हे फार अवघड कार्य असते. असे कार्य करणा-या कोणत्याही महान शक्तीला विरोध हा सोसावाच लागतो. येशूच्या बाबतीत अगदी असेच घडले होते. येशू त्याचा धर्म त्याची तत्वप्रणाली ही त्याच्या अनुयायांना मान्य होती परंतू ती सर्वांनाच मान्य होणारी नव्हती त्यामुळे विरोधाची भावना ही समाजात घट्ट रुजलेली होती. त्यामुळे ख्रिश्चन धर्म व पूर्वेकडे चालत असलेला मुस्लीम धर्म यांच्यामध्ये ताणतणाव राहणार होतेच. त्यामधून कधीना कधी युध्दाची ठिणगी पडणार होती. म्हणूनच येशूच्या मृत्यूनंतर ख्रिश्चन धर्म व मुस्लीम धर्म यांच्यात धर्मयुध्दे झाली त्यांना ख्रिश्चन धर्मातील धर्मयुध्दे असे संबोधले जाते.

**उद्दीष्टे :-** १) ख्रिश्चन धर्माची माहिती जाणून घेणे.
२) ख्रिश्चन धर्म युध्दांची पार्श्वभूमी अभ्यासणे.
३) ख्रिश्चन धर्म युध्दाचे कारणे व परिणाम यांची माहिती घेणे.

**धर्म युध्दाची पार्श्वभूमी :-**

पाश्चिमात्य देशं आणि पूर्वेकडील देश यांच्यामध्ये प्राचीन काळापासून व्यापार चालू होता. हा व्यापार खुशकीच्या मार्गाने चालत असे हा व्यापार आर्थिक दृष्टिकोना बरोबर धार्मिक सांस्कृतिक राजकीय दृष्टीनी ही चालत असे. मध्ययुगात जसे कॉन्स्टंटीनोपॉल हे शहर अरबांनी जिंकून पश्चिमेकडून पूर्वेकडे येणारा व्यापारी मार्ग बंद पाडला. त्याप्रमाणे येशू ख्रिस्तांच्या मृत्यूनंतरही घडलेले होते. इ. स. ११ ते १३ व्या शतकात ख्रिश्चन धर्मात धर्मयुध्द घडलेली होती त्याचे कारण जसे धार्मिक होते. तसेच सांस्कृतिक, आर्थिक ही होते. जेव्हा एखादया समुहाची मक्तेदारी दुस-या समुहावर चालते आणि ती सहनशलतेच्या पलीकडची होते तेव्हा **युध्दे** होतात. याच दृष्टिने ख्रिश्चन

धर्मातील ही युध्दे झालेली आहेत. मुस्लिम धर्माचे वाढते प्रभुत्व, त्यांची मक्तेदारी धर्म प्रसाराचे त्यांचे अतिरेकी वेड हे या युध्दांना कारणीभूत ठरले होते.

### धर्मयुध्द अर्थ व संकल्पना :-

रोमन साम्राज्यात ख्रिस्तीधर्मांचा उदय झाला. या रोमन साम्राज्यांची विभागणी उत्तरेकडून येणा-या 'खखर' टोळयांच्या आक्रमणामुळे झाली. पूर्वेकडील व पश्चिमेकडील रोमन साम्राज्य असे दोन विभाग पडले जुन्या रोमन साम्राज्याची 'रोम' हीच राजधानी होती नंतर ती राजधानी कॉन्स्टंटीनोपॉले ही झाली. त्यामुळे ग्रीक भाषा ही सर्वत्र वापरली जात होती. पूर्वेकडील रोमन साम्राज्यात ग्रीका शिवाय इतरही लोक व इतरही भाषा होत्या परंतु ग्रीकाचे साम्राज्य हा सर्वस्व आणि त्यांच्या चर्च ही त्यांना आवडत नव्हती. त्यामुळे ग्रीकांच्या वर्चस्वातून पूर्वेकडील साम्राज्य मुक्त करण्यासाठी जी युध्दे झाली त्यांना धर्मयुध्दे असे म्हणतात.

क्रुसेडस या शब्दाचा प्रचलीत अर्थ ख्रिश्चन धर्मिय आणि इस्लाम धर्मिय यांच्या मध्ये झालेली युध्दे असा होतो. ही युध्दे जी मानवी समाजावर सर्वांगीण दृष्टिने दिर्धकाळ परिणाम करणारी ठरली ती ११ ते १३ व्या शतकामध्ये झाली.

### धर्म युध्दाचा वृत्तांत :-

युध्दांचे स्वरुप धार्मिक असले तरी ही पूर्व आणि पश्चिम यांच्या मधील संघर्षाची ही कथा आहे. पश्चिमेकडील रोमन साम्राज्य आणि पूर्वेकडील रोमन साम्राज्य असे रोमन साम्राज्याचे दोन भाग पडतात. इ. स. नाच्या ८ व्या शतकामध्ये शार्लमेन या राजाने युरोपमध्ये ख्रिश्चन धर्माचा पाया घातला यालाच रोमन साम्राज्य असे म्हणतात. या साम्राज्यात फ्रान्स, बेल्जिअम, हॉलंड, स्वित्झर्लंड व इटली इ. देशांचा समावेश होतो. शार्लमेनने स्थापन केलेले हे रोमन साम्राज्य पवित्र रोमन साम्राज्य म्हणून प्रसिध्द होते. शार्लमेनला ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी पूर्वेकडे ही रोमन साम्राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला. कॉन्स्टंटीनोपॉल येथील सम्राटांना रोममध्ये उदयास आलेले रोमन साम्राज्य मान्य नव्हते. म्हणून ते शार्लमेनला विरोध करीत होते. तरीही शार्लमेनने पूर्वेकडे रोमन साम्राज्याची स्थापना केली. अशा रितीने दोन रोमन साम्राज्ये निर्माण झाली. पूर्वेकडील रोमन साम्राज्यामध्ये मुस्लिमांची संख्या जास्त होती. रोमन साम्राज्यामध्ये चर्च आणि पोप यांचे महत्व फार वाढलेले होते. ख्रिश्चन जगताचा स्वामी हळूहळू अनियंत्रित सत्ताधिशांप्रमाणे वागू लागले. राजसत्तेपेक्षा ही चर्च व पोपचे महत्व वाढले. पोप आणि राजसत्ता यांच्यात संघर्ष सुरु झाला. अरब आणि तुर्क यांनी पूर्वेकडील रोमन साम्राज्यावर आक्रमणे करण्यास सुरुवात केली. इ. स. १४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्स्टंटीनोपॉलचा पाडाव केला आणि पूर्वेकडील रोमन साम्राज्य नष्ट झाले. मुस्लिम धर्माचा आक्रमणाचा दिवसेंदिवस जास्त त्रास रोमन साम्राज्यास होऊ लागला. पूर्वेकडच्या पवित्र रोमन साम्राज्यामध्ये येशू ख्रिस्ताचे पवित्र स्थान जेरुसलेम हे होते. सर्व ख्रिश्चन धर्मियांचे ते तीर्थ क्षेत्रच होते. मात्र इस्लामांनी जेरुसलेम वर ताबा मिळवला होता. हे ठिकाण इस्लामांच्या आक्रमणातून मुक्त करण्यासाठी ख्रिश्चन धर्मियांना युध्दे करावी लागली त्यांनाच धर्मयुध्दे असे म्हणतात.

### धर्म युध्दासाठी घडलेली कारणे :-

ख्रिश्चनांची पवित्र भूमी असलेले जेरुसलेम हे मुस्लिमांच्या वर्चस्वातून मुक्त करणे हा धर्म युध्दाचा पहिला उद्देश होता. पण तरीही मवाळ प्रवृत्तीच्या आणि सर्वधर्म समभाव तत्वांचे पालन करण्या-या ख्रिश्चनांनी युध्दे केली. आणि ती सुध्दा एक दोन नाही तर दहा याचे आश्चर्य वाटते. तुर्क लोकांचे फारच अन्याय व अत्याचार हे युध्दाचे मूळ कारण होते. १०७५ नंतर तुर्की लोकांनी ख्रिश्चन धर्मी यांवर केलेली अमानवी अत्याचार हे धर्म युध्दांचे नैमित्तिक कारण ठरले. जेरुसलेम ताब्यात आल्यानंतर तुर्कांनी ख्रिश्चन लोकांचा अमानुष छळ सुरु केला. ख्रिश्चनांना तरुंगात टाकणे, त्यांना मारहाण करणे, त्यांच्यावर जिझिया सारखा कर बसविणे आणि ख्रिश्चन पुरोहितांची अवहेलना करुन त्यांची धिंड काढणे इ. गोष्टी केल्यामुळे ख्रिश्चन धर्मिय चिडले यामुळे युरोपातील ख्रिश्चन समाजात संताप असंतोष निर्माण झाला.

### धर्म युध्दाचे परिणाम :-

ख्रिश्चनांना पूर्णतः अपयश आल्यामुळे आणि त्याची पवित्र भूमी जेरुसलेम ही मुक्त न करता आल्यामुळे ख्रिश्चनांना फार मोठे अपयश सहन करावे लागले. कारण धर्म युध्दात जे जे ख्रिश्चन सहभागी झाले होते त्या सर्वांचे ध्येय व उद्दिष्ट एक नव्हते. पोप ला आपली सत्ता सर्व श्रेष्ठ करायची होती. राज्यकर्त्यांना पूर्वेकडे वर्चस्व निर्माण करुन बाजारपेठा मिळवायच्या होत्या. तर सरंजामदारांना व जामिनदारांना जमिनी मिळवायच्या होत्या.

### १- राजकीय परिणाम :-

ख्रिश्चन धर्मामध्ये राजकीय भावना व देशाभिमान जागा झाला. धर्मसत्तेचा प्रभाव कमी होवून राजसत्तेचे महत्व वाढले.

**२- सामाजिक व आर्थिक परिणाम :-**

पिढयान पिढयाचे भूदास मुक्त झाले आणि ते स्वतंत्र शेतकरी बनले काही भूदास शहराकडे धावले आणि ते कामगार बनले या युध्दानंतर समाजामध्ये व्यापारी वर्ग उदयास आला आणि त्यांनी आर्थिक क्षेत्रामध्ये ब-याच प्रमाणात युरोपची आर्थिक स्थिती भक्कम केली.

**३- वैचारिक परिणाम :-**

युध्दामुळे पूर्व व पश्चिमेकडील संस्कृतीत संगम घडून आला. एकमेकांच्या विचारांचे आदान प्रदाने सुरु झाली. अज्ञात असणा-या भूमीचा शोध घेण्याची जिज्ञासा वाढली. ग्रंथलेखन शास्त्रांचा अभ्यास तसेच ललीत कलेचा अभ्यास सुरु झाला अशा रितीने धर्म युध्दामुळे युरोपच्या सामाजिक जीवनात क्रांती झाली.

**संदर्भ :-**

१. डॉ. भूषणकुमार उपाध्याय, जगज्जेते, अनुवाद प्रा. डॉ. शकुंतला कोलारकर, विजय प्रकाशन नागपूर.
२. गजानन भिडे व विलास निंबाळकर, मध्ययुगीन युरोप, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. ज. ग. जोगळेगर, पहिले क्रुसेड, इस्लाम आणि ख्रिश्चन यांच्यातील संघर्षगाथा, नव चैतन्य प्रकाशन, प्रथमावृत्ती २००७.
४. वि. वा. देशपांडे, भारतीय तत्वज्ञानाचा ख्रिस्ती विचारावरील प्रभाव, संवाद प्रकाशन, पुणे.

LBP PUBLICATION